# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 13/03/2021 (शनिवार)

(सायंकाळ)

---

**अवैधरीत्या देशी–विदेशी दारुची**
**वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक**
**एकुण 1,95,810 रूपयाचा माल जप्त**

पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 12/03/2021 रोजी पो. स्टे. कळमेश्वर हद्दीत अवैधरित्या दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध एकुण 4 केसेस करण्यात आल्या. पो.स्टे. कळमेश्वर स्टाफ व स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मौजा लिंगा रोड एमआयडीसी कळमेश्वर, मौजा बस स्टॉप कळमेश्वर, कोतवाल बर्डी शिवार, मटन मार्केट कळमेश्वर टाउन या चार ठिकाणी रेड केली. त्यामध्ये आरोपी क्र. 1) गणेश कैलास बावणे, वय 26 वर्षे, रा. वार्ड क्र 1 लिगां, 2) महावीर नथ्थुजी मेव्हणे, वय 53 वर्ष, रा. कोठे खापरी सुरेंद्र रूपसींग ठाकुर, रा. ठाकुर मोहल्ला पि.डब्लु.एस.कॉलेज जवळ कळमेश्वर, 3) शुभम नारायन युवनाते, रा. कोतवाल बर्डी ता. काटोल व 4) रोशन संभाजी खेडीकर, वय 29 वर्ष, रा. वार्ड क्र 3 आदासा हे अवैध्यरित्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन देशी–विदेशी दारूच्या एकुण 153 निपा, 4 दुचाकी मोटरसायकल, 1 ॲल्टो कार व साहित्य असा एकुण कि. 1,95,810/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग श्री अशोक सरंबळकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोकलस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक श्री. आसिफराजा शेख यांचे मार्गदर्शनात सपोनी मुडे, पोहवा सुनिल कामडी, पोना गणेश मुदमाळी, श्रीकांत बोरकर, पोशि आशिष बोरकर पंकज पाटील स्थानिक गुन्हे शाखेचे सफौ जयप्रकाश शर्मा व महेश बिसने यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

## अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारुची
## वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 3 किमी अंतरावर शिवापुर फाटा उमरेड येथे दिनांक 12/03/2021 चे 06.30 ते 07.00 वा. दरम्यान आरोपी नामे– सतिश सुरेश भोसले, वय 36 वर्ष, रा. गरडेपार ता. भिवापुर त. उमरेड हा आपल्या ताब्यातील एचबी शाईन लाईव्ह क्र. एम.एच– 40/सी.बी– 8462 किं. 90,000/–रू. चे गाडीच्या समोर 02 पांढऱ्या रंगाचे प्लास्टीक डबकीत 50 लिटर मोहाफुल गावटी दारू किंमती 15,000/–रू. चा माल असा एकुण 1,05,000/–रू चा मुद्देमाल अवैदयरित्या वाहतुक करून घेवुन जातांना नाकाबंदी दरम्यान मिळुण आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस शिपाई गोवर्धन शहारे पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ), (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. अरूण जयसिंगपुरे मो. क्र. 9049175485 हे करीत आहे

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलिस अधिकारी उमरेड विभाग श्री भिमराव टेळे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. यशवंत सोलसे, पोहवा श्री. रमेशचंद्र त्रिपाठी, पोना अरविंद चव्हाण, पोशि गोरधन शहारे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर